# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन, परिसर, गाडनगर, अमरावती

Email :- roamravati.dte@gmail.com, Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913


**परिपत्रक**

क्रमांक :- विकाअ/आस्था/जावैधता /२०१३/ 1673

दिनांक :- 25/06/2013

विषय : मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक:बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक १८ मे २०१३

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येत की, आपल्या अधिनस्त गट-क व गट-ड मधिल ज्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी अदयापपर्यत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसेल त्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

शासकीय /निमशासकीय इत्यादीच्या सेवेमध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांपैकी (अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गामधील) ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात पडताळणी समितीकडक अर्ज सादर केला नाही अशा कर्मचा-यांनी आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आवश्यक त्या परिपुर्ण कागदपत्रांसह, अर्ज संबंधित जात पडताळणी समितीकडे दिनांक ३१.७.२०१३ पर्यत सादर करावा व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयातील आस्थापना अधिकारी यांना तात्काळ सादर करावी. तसेच संस्था प्रमुख यांनी कार्यरत असणा-या मागासवर्गीय कर्मचा-यांपैकी (ज्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही) सर्व कर्मचा-यांनी दिनांक ३१.७.२०१३ पर्यत जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचे प्रस्ताव जात पडताळणी समितीस सादर केलेले आहेत याची खातरजमा पावतीसह करुन घ्यावी व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसंच वरिल संदर्भीय शासन परिपत्रक आपले अधिनस्त मागासवर्गीय कर्मचारी यांचे निदर्शनास आनावे.

तसेच कार्यरत असलेल्या गट-अ व गट-ब आणि गट-क व गट-ड मधिल मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची माहिती स्वतंत्र प्रपत्रात दिदनांक २९.६.२०१३ पर्यत या कार्यालयास सादर करावी.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम | जातीचा प्रवर्ग | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त आहे कींवा नाही (असल्यास सत्यप्रत जोडावी व नसल्यास वरिलप्रमाणे कार्यवाही करावी) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

प्रत:: प्राचार्य,शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय अमरावती/शा.औ.नि.शा.महा.अमरावती
प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशीम/मर्तीजापुर/शा.नि.महिला तंत्रनिकेतन,यवतमाळ
प्राचार्य,डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन अमरावती/गीतादेवी खंडेलवाल ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी अकोला
यांना माहिती व उचित करर्यवाहीकरीता.

D:\S.P.Sonone-1\R.O.Amt\Cerculer\Ganral.doc